"Women and Labour"

Vidya Telang

# कष्टाच्या गाड्याला जुंपलेल्या गंगू, सखू, रखमा...

माझ्या घरासमोर एक भलीमोठी झोपडपट्टी आहे. शहराचा विस्तार सारखा वाढत राहुलाय तशतशी दहा मोठ्या बिल्डिंग आणि बंगल्यासरशी एक झोपड-पट्टी वाढतीय. माझा जायचा यायचा रस्ता याच झोपड्यांतून जातो. झोपडपट्टी जवळच या भागची मंडई संध्याकाळी भरते. इथल्या बऱ्याच लोकांची या ना त्या निमित्ताने माझी ओळख झालीय.

## मोलकरीण

गंगूबाई बऱ्याच दिवसात दिसली नाई. परवा दिसली. म्हणून विचारलं कुठं होता ? गंगूबाईनी सांगितलं.

"आवो मालक एक रातच्याला दारू पिऊन सापडलं टरकाखाली. ससूनला व्हतं." सक्काळ संध्याकाळ ससूनला जाऊन, आन काम संबाळून १५ दिवस झाले बगा – गंगूबाई डालग्यात कोंबड्या घालत मला सांगत होती. गंगूबाई घरी धुणं भांडी करायचं काम करते. गंगूबाईला सहा मुलं आहेत. चार मुली आणि दोन मुलगे. एका मुलीचं लग्न झालेलं, नवरा हमाली काम करणारा. काम असते तेव्हा घरात पैसा आणतो. इतर वेळेला बिड्या ओढीत इथं तिथं बसतो. "एवढी दगदग होती तर बदली द्यायचं नाहीतर गुणाला पाठवायचं." मी म्हटलं. "बाई, एकाद्या बाईला बदली दिलं तर खाऊ काय, आवो पंधरा दिवसाचं पैसं जातील. बाया काय दुकणं आंगावर काढू शकतात. आन् बगा गुणावंता लहान पडती. मला एकटीलाच सात-आठ घरची कामं झेपत न्हाईत म्हणून तिला शाळा सोडायला लावली. त्ये लेकरू करंल व्हय ? तसा अता तिचा बी हात चालतो पन भांडी उचलत न्हाईत. भांडं, कप फुटला तर कचकन् मालकीन पैसे कापती. काय बी असू द्या कामावर मलाच जायला हावं. यील दुकणं. दुकण्याचं काय यवढं. गुणवंताच्याच येळपासून न्हा दिवसाची वली बाळं असून बी म्या कामाला जात व्हते. आमाला व्हाय बाळंतपणाची रजा ?

गंगूबाईच्या शेजारीच सखू राहते. मला सखू आली. तिच्या हातात चिमणी आणि मेण होती. तसं मी म्हटलं दिवसा – ढवळ्या मेण लावतीस काय ? सखू हासली आन् म्हणाली. शि लेल्या बायांना काय कळायचं व आमचं दुखणं ? तिने माझ्यासमोर तिच्या पायाची बोटं दाखवली सगळ्या बोटांची तळपायाकडून सालं निघालेली चिखल्या झालेल्या. ४-६ दिवसांनी दहा पैशा मेणवत्ती आणून पायात सखू मेण लावत होती. बा कामावर सारखं पाण्यात आणि सोड्या–साबणा हातपाय न्हातात. अशी सालं निघतात – प्लॅस्टिकची चप्पल घेतली तरी ३ रुपये जातात.–फुफाटयात पर बोटात माती जाती – तवा असला गावरन उपा हाय आमचा". गंगूबाईनी डालग्यात कोंबड्या घातल्या होत्या तीही येऊन बसली अन् म्हणाली, "बाई आव भांडी धुणी करणाऱ्या सगळ्या बायांच्या पायाची सालं निघतात. तिशीची बाई आसली तरी गुडघं मोडून येतात, कंबर तर दुकतीच. सांधं तर दुकतातच. सखी लावती मेण पण मला तर वेळ बी होत नाय ! आमचं कामच आसलं पान्यातलं. काय करायचं ?" गंगू सखू असंच सांगत राह्यल्या. मालकिनी कशा बोलतात. भांडी धुणी करायची त्यांनी ; पण जात वेगळी म्हणून फुटक्या कपातन 'च्या' द्यायचा. कप फुटला की 'बारा आणं' कापायचं. एकादीच मालकीण चांगली असते. शिळं पाकं न्हायलेलं अन्न मिळतं हा एवढा 'मोठा' फायदा होतो.

या झोपडपट्टीत सगळ्याचं मिश्रण आहे. ही झोपड-

शी तयार झाली ते कोणाला माहीत नाही. एक झोपडपट्टी होती. नंतर दोन झाल्या. दोनाच्या बाराच्या पंचवीस आणि आता मोठी झोपडपट्टी. ाचा नळ एकच आहे. चार संडास आहेत. 'फाटंच' आंघोळ उरकतात नाहीतर आंघोळीला ट्टीच. प्रत्येकाच्या घरातलं म्हणजेच झोपडीतीलं सांडपाणी वाहून जात नाही. डबकी आहेत म्हणून डुकरंही आहेत. कुणीतरी तरुण मुलांनी एक मारुती इथं बसवलाय. हनुमान जयंतीला त्याच्या आसपासचा भाग साफ होतो, तेवढीच या झोपडपट्टीची साफसफाई. लहान मुलं-बाळ आसपासच विधी उरकतात.

रखमा माझ्याशेजारी बसमध्ये बसली. तेवढ्यात चंपाबाईचं नवं कोरं लुगडं पाहून मी म्हटलं, "चंपा पंचमी आत्ताच साजरी होय गं?" कंडक्टर आला आणि बोलणं अर्धंच राहिलं. रखमा कानाजवळ येऊन म्हणाली, "बाई तिची सदा पंचमी असती." आणि मग गुप्त काही सांगावं तसं म्हणाली "आवो बांधकामावर जाती नं तिथं मुकादमालाच लागू झालीय.' माझ्या डोक्यात प्रकाश पडला. "नवऱ्याला क्षय झाला म्हणून शेती गहान ठिऊन इथं आली. नवरा मेला. हिला चार पोरं हायती. हिच्या ३॥ रुपये रोजावर भागतं काय? मकादमाला लागली. आता त्यो कधी हिच्या पोरांना कपडं करतो–तिची पोरं त्येला मामा मामा म्हणत्यात. मग भेळ बी मिळती. गुडदाणी बी मिळती. मुकदमाला काय हो? आवं हिची तारी हायना? म्हान आल्यालं हाय की न्हाय काई म्हाईत नाई. पन आत्तापासून आईचं नखरं बगून पावडर काय लावती आनी डोळं काय करती. घरी पोरं सांभाळायला हवी म्हणून दुसरीतच साळा सोडली. आता हिची बी एक दिवस चंपी व्हईल. पोटासाठी शरीर बी विकावं लागतं. तिचा तरी काय दोसं म्हणायचा." रखमा एकेक सांगतच होती.

## हमाल स्त्री

रखमाची गोष्टच वेगळी होती. गेली दहा वर्षं मी रखमाला बघतेय. रखमा हमाली काम करते. इतक्या लांबून सकाळी उठून भवानी पेठेत कामाला जाते. त्याच्या आधी ती मंडईत कामाला होती. तेव्हा भाजी, कांदे, बटाटे यायचे पहाटे म्हणून लवकर उठून चारला मंडईत पोहचायचं. कोणाचं काम असेल तर दहापर्यंत कामाची वाट बघत थांबायचं. घरी एकदा यायचं आणि तीन मैल चालत परत जायचं. ते रात्री घरी यायचं. दिवसभर इतके श्रम करूनही दहा दहा तास घालवूनही रखमाला दीड, फारतर तीन रुपये मिळणार. ही गत मंडईतली. भवानी पेठेत येवढंच की, कधी हेलपाटा वाया जात नाही. रोजला दीड रुपाया तरी मिळतो. रखमा स्वतःच म्हणते बाई आमचं त्यातल्या त्यात बरं हाय– त्या ठेसनावर आवो हमाली बायाना कोळशाची पोती बी मालगाडीतून काढावी लागतात. त्येचं आमच्यापेक्षा बी वंगाळ हाय. हमाली कामाचा एक फायदा म्हणजे पोरं बाळं लहान बरोबर निऊन सावलीला ठेवता येतात. रखमानी सांगितलं– माझ्या पोरीला नवऱ्यानं पोर व्हत नाही म्हणून टाकून दिली. तीबी आता तिकडं सरकारी गुदामावर कामाला हाय. या दोन्ही मायलेकी घर संभाळतात. रखमाच्या नवऱ्याचे पाय अपघातात गेलेत. तो घरबसल्या विडी वळायचं काम करतो. रखमाला टाकून दिलेली अंजी धरून सात मुलं आहेत, दहा माणसांचं घर २०० रुपये मिळकतीवर सांभाळतात.

रखमा काय, सखू काय, गंगूबाई काय, इथल्या बायका दिवसभर घराबाहेरच असतात. १० तास राबूनही त्यांची मिळकत शंभर रुपयांवर जात नाही. कोणी मग कोंबड्या पाळून अंडी विकतं–सोनाबाईनी तर गुडदाणी करून रोज चार–आठ आणे मिळवायचा उद्योग सुरू केला.

## डबेबाटलीवाली

एकदा दुपारची पडले होते, बेल वाजली. पाहिलं तर शांताबाई. तिच्याबरोबर आणखी एक पोरसवदाच बाई होती. मला काहीच कळेना. शांतानं बोलायला सुरुवात केली. बाई ही यशवदा. मपल्या माहेरगावचीच हाय, दुष्काळ हाय म्हनून पुन्यात आली. आमच्याच झोपडपट्टीत झोपडी घातलीय. डबा बाटल्याचा धंदा करती. तुम्ही हिलाच देत जावा लोनच्याच्या, तेलाच्या बाटल्या हा. उगच नाहीतर वाटून टाकशील,' पुढे पुढे महिन्या दोन महिन्यानी यशोदा डबे बाटल्या न्यायला

येऊ लागली. धंद्यात गोड बोलायचं एवढंच भांडवल लागतय. यशोदा हळूहळू माझ्याशी मनमोकळं बोलायला लागली. बाई आधी वाटलं बोहारनीचाच धंदा भुरू करावा. पण त्याला पैका जास्त लागतोय. परत अलीकडं पुरुष बोहारी झालेत. ते हिंडत्यात सायकलवर माल टी त्रपतो. आता माला सायकल येत नाय. पायी व्हतं त्यवडं फिरते. ९ रुपये पठाणाकडनं कर्ज काढले. आता २ रुपये राहिलं हाय बगा. पन आता पावसाळ घाचं दिस आले–मालकाला बी काम मिळेना झालय. सकाळी ८ ते ६ पर्यंत फिरती बगा– झोपडीत तीन पोरं ठिवतो. थोरली हाय धा वर्षाची. संबाळती धाकल्याना. दोगं वणवण फिरतो तवा दोगाचं मिळून दोन अडीच रुपये मिळत्यात. एकाद्या दिशी ते बी मिळना झालाय. जी बाई उठती ती डबा बाटलीवाली न्हाईतर धुणीभांडी करतीय. काय काम आसल तवा बोलवत जावा. "

धाकट्याला कांजिण्या आल्या म्हणून मी चार दिवस रजा काढली. मला गॅलरीत दुपारी बघून चंद्रा मिश्री लावत होती ती आली. 'कावं बाई आज घरी ? " मी म्हटलं " धाकटा तापलाय म्हणून रजा काढलीय. " तशी चंद्रा खळ्‌दिशी हसली. बर हाय बाई. तुम्हाला बरी रजा मिळती. आम्हाला बाळांतपणाची रजा न्हाई, आजारपणाची रजा न्हाई, रजा न्हाईच. ज्या दिवशी काम बंद त्या दिवशी खायचं पण बंद. आवं माजं मालक गुदस्ता गेलं तर सावडलं आनी म्या कामावर हजर. आमच्या हातावरच्या पोट असलेल्या बायाना रजा कसली आलीय ? " का वो बाई रजा घीतली तर त्या दिवसाचा खाडा धरतात का ? " नाही ग ! त्या दिवसाचा पगार मिळतो ना. " 'ऑ वासून चंद्रा माझ्याकडे बघत राहिली, मागे एकदा मला बोनस मिळाला तेव्हा मी चंदूला तिचाकी सायकल घेतली. तेव्हा चंद्रा म्हणाली होती. " बाई तुम्हा नोकरदारांना बोनस मिळतो – पोराबाळांचे हट्ट पुरवता येतात. आमचं बगा कसं हाई, माझी रजनी आता लुगडं नेसायला लागली. म्याच दंड घातलेली लुगडी नेसती. दर महिन्याला वाटतं हो तिला ध्यावं लुगडं. उफाड्याची पोर, दंड घातलेली पातळं जातात बगा लवकर. असं म्या तिकडचा त्या कोपऱ्यावरच्या बंगल्यात काम करतीना बाईला म्हटली लई श्रीमंत आहेत बगा. त्यांची थो फाटलेली–घस लागलेली बाईनी २०–२० रुपाय इकत दिली. मला पंचवीस रुपायचं धुवाय पुसायचं हाय महिन्याला. धा धा रुपये घेतात कापून." सांगत होती.

या बायका भेटल्या की बोलतात, सांगत राहतात रात्री घराची दारं बंद करताना या झोपडपट्टीकडे जातं. मूल रडल्याचा, त्याला जोरात धपाटे घातल्या आवाज येतो. कधी कोणीतरी मारत असतं. माझ्या कामाला येणारी शेवंता आठवड्यातून एकदा दोन मार खाते. रडत भेकत कामाला जाते. रट्टं खाय बी सवं झालीया म्हणून बोलून जाते. अंजीरा 'भाऊ' येत नसून कोनीबी येतं. आन् अंजीरा सांग की म्या बिड्या वळायला जाती. कुठली वो काम मिळना झालय. हा धंदा आता सुरू केलाय. जवानी हाय तोवर येतील हे बाप्ये मग कोण हाय वो हिला ? असंही कोणतरी सांगून जातं.

एक गोष्ट मात्र खरी आहे. या सगळ्या जणी दहा-दहा तास राबतात – ढोरासारख्या मरतात...... यांना कामाची निश्चिती नाही – पगाराची खात्री नाही – यांच्या मुलांना शिक्षण नाही – पोटभर ज्यांना खायालाही मिळत नाही त्यांनी शिक्षणाचा विचार करायचा नसतो. यांचा कामाचा दिवस वीस तासांचा असतो. यांची कमाई दीड रुपया नाहीतर दोन रुपये. तीन रुपये ज्या दिवशी मिळतात तसा दिवस सहामहिन्यातून एकदा.

२० तासाचा दिवस केला, ३० दिवसाचा महिना केला, वण वण भटकलं, ऊन पाहिलं नाही, पावसाकडे लक्ष दिलं नाही, थंडीची पर्वा केली नाही – इतके कष्ट केले तरी उघड्यावर आहेतच, दोन्ही वेळा अन्न पोराना देता येत नाही. या चक्रातून कसं बाहेर पडायचं ? सुटका केव्हा व्हायची ?

– विद्या तेलंग